आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२६ मे २०२६ - मंगळवार

**ठळक बातम्या**

- नवी दिल्ली इथं क्वाड देशांच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांच्या बैठकीत परस्पर सहकार्य वाढवण्याबाबत चर्चा /इतर देशांनाही मदत करण्यावर भारताचा भर

- सावंतवाडी रेल्वे स्थानकाला मधु दंडवते यांचं नाव द्यायचा राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय

- नाशिकच्या कांद्याला १ हजार ५८० रुपये प्रति क्विंटल हमीभाव जाहीर; चोवीसशे रुपये भाव देण्याच्या मागणीसाठी महाविकास आघाडीचं आंदोलन

- आयपीएल क्रिकेट स्पर्धेच्या पात्रता फेरीतला पहिला सामना आज रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स यांच्यात रंगणार

**आणि**

- नैऋत्य मोसमी पावसाचं आगमन आज केरळमधे होण्याची शक्यता

**<><><><><>**

नवी दिल्ली इथे परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्या अध्यक्षतेखाली आज क्वाड देशांच्या परराष्ट्र व्यवहार मंत्र्यांची बैठक झाली. या बैठकीला ऑस्ट्रेलियाच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री पेनी वोंग, जपानचे परराष्ट्र व्यवहार मंत्री तोशिमित्सू मोतेगी आणि अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मार्को रुबियो उपस्थित होते. क्वाड राष्ट्रांमधलं सहकार्य अधिक दृढ करण्यावर आणि त्याचबरोबर इतरांनाही मदत करण्यावर डॉ. जयशंकर यांनी या बैठकीत भर दिला. क्वाड राष्ट्रं ही लोकशाहीप्रधान, मुक्त समाज असलेली राष्ट्रं असून, समृद्धीसाठी नावीन्य आणि सर्जनशीलतेला प्रोत्साहन देतात. तसंच दहशतवादाच्या सामायिक धोक्याचा सामना करण्यावरही क्वाड राष्ट्रांचा भर असल्याचं जयशंकर म्हणाले.

क्वाड राष्ट्रांना आर्थिक धोरणात्मक साधनांचा लाभ घेण्यासाठी तसंच खाणकाम आणि प्रक्रिया तसंच महत्त्वपूर्ण खनिजांच्या पुनर्वापरासह महत्त्वपूर्ण खनिज पुरवठा साखळी मजबूत करण्यासाठी गुंतवणुकीत समन्वय साधण्यासाठी 'क्वाड क्रिटिकल मिनरल्स फ्रेमवर्क' मार्गदर्शन करेल, असं अमेरिकेचे परराष्ट्र व्यवहार मंत्री मार्को रुबियो म्हणाले. होर्मुझच्या सामुद्रधुनीमधे मुक्त आणि सुरक्षित सागरी मालवाहतूक सुनिश्चित करण्यासाठी तसंच पश्चिम आशियामध्ये स्थैर्य आणण्यासाठी राजनैतिक प्रयत्नांची गरज जपानचे परराष्ट्र व्यवहार मंत्री तोशिमित्सू मोतेगी म्हणाले.

**<><><><><>**

सावंतवाडी रेल्वे स्थानकाला कोकण रेल्वेचे शिल्पकार माजी रेल्वेमंत्री दिवंगत मधु दंडवते यांचं नाव द्यायचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला आहे. आज मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय झाला. त्यानुसार या स्थानकाचं नाव 'लोकमान्य मधु दंडवते रेल्वे टर्मिनस' असं असेल. तसा प्रस्ताव केंद्र शासनाकडे पाठवला जाणार आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांच्या २०२६ मधल्या सर्वसाधारण बदल्यांना मुदतवाढ द्यायचा निर्णयही आज मंत्रिमंडळानं घेतला. डोंबिवलीत सोनारपाड्यातल्या पिंपळेश्वर मंदिराला ४ एकर २५ गुंठे जमीन द्यायलाही मंत्रिमंडळानं मान्यता दिली.

**<><><><><>**

नाशिक मधल्या कांद्याला १ हजार ५८० रुपये प्रति क्विंटल हमीभाव आजपासून लागू झाल्याचं केंद्र सरकारने परिपत्रकाद्वारे सांगितलं आहे. कांद्याचे दर कोसळल्याने नाशिक जिल्ह्यात ठिकठिकाणी आंदोलनं झाली होती, त्यामुळे हा निर्णय सरकारने काल घेतला. हे दर फक्त नाशिक जिल्ह्यातल्या शेतकऱ्यांसाठीच असतील.

**<><><><><>**

कांद्याला २४ रुपये प्रतिकिलो इतका हमीभाव मिळावा या मागणीसाठी आज नाशिक जिल्ह्यात चांदवड इथे महाविकास आघाडीच्या नेतृत्वाखाली रास्तारोको आंदोलन करण्यात आलं. मुंबई-आग्रा महामार्गावरच्या या आंदोलनात काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अंबादास दानवे, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे नेते रोहित पवार यांच्यासह अन्य नेते, कार्यकर्ते आणि शेतकरी सहभागी झाले होते. गळ्यात कांद्याच्या माळा घालून तसंच बैलगाडीतून आलेल्या नेत्यांनी केंद्र आणि राज्य सरकारवर टीका केली. यानंतर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं.

**<><><><><>**

देशात वाढती महागाई, इंधन दरवाढ आणि नीट प्रश्नपत्रिका पेपरफुटी आदी मुद्द्यावरून आज नागपूरात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने संविधान चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत सायकल मोर्चा काढला. यावेळी केंद्र आणि राज्य सरकारच्या विरोधात घोषणाबाजी करत निषेध नोंदवण्यात आला. या मोर्चात माजी मंत्री अनिल देशमुख यांच्यासह शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते.

**<><><><><>**

राज्यात पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध असून, कोणत्याही प्रकारची इंधन टंचाई नसल्याचं अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी स्पष्ट केलं आहे. मंत्रालयात आयोजित राज्यातील पेट्रोल-डिझेल वितरणाबाबत आढावा बैठकीत ते बोलत होते. काही भागांत अफवांमुळे नागरिकांकडून अतिरिक्त इंधन खरेदी होत असल्याने पेट्रोल- डिझेल विक्रीत लक्षणीय वाढ झाल्याचं समोर आलं आहे. त्यामुळे नागरिकांनी घाबरून अनावश्यक साठा करू नये, असं आवाहन भुजबळ यांनी केलं.

**<><><><><>**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळातर्फे वाढत्या इंधन खर्चावर नियंत्रण मिळवण्यासाठी “इंधन बचत... म्हणजेच इंधन निर्मिती” ही संकल्पना राबवण्यात येणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. एसटीच्या प्रत्येक आगाराने दररोज किमान ५ लिटर डिझेलची बचत करण्याच्या दृष्टीने आवश्यक उपाययोजना राबवाव्यात, असे निर्देश त्यांनी मुंबईत मंत्रालयातल्या आपल्या दालनात बोलावलेल्या एसटी महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बैठकीत दिले.

**<><><><>**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात शेतकऱ्यांना कॅनमध्ये पेट्रोल, डिझेल द्यावं, असे आदेश जिल्हा पुरवठा अधिकारी प्रवीण फुलारी यांनी दिले आहेत. शेतकऱ्यांच्या मान्सूनपूर्व मशागतीच्या कामांच्या या दिवसांमध्ये पेट्रोल पंप चालक शेतकऱ्यांची अडवणूक करत असल्याची माहिती समोर आल्यानंतर त्यांनी हे आदेश जारी केले.

**<><><><>**

राज्यातल्या मंदिर विश्वस्त संस्था आणि काही धार्मिक संघटनांनी प्रस्तावित 'महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन मसुदा कायदा २०२६' ला तीव्र विरोध करत तो मागे घेण्याची मागणी केली आहे. हा कायदा वक्फ जमिनींना आपल्या कक्षेतून वगळत असल्याचा दावा या संघटनांनी केला आहे. राज्यातल्या अनेक जुन्या आणि ऐतिहासिक मंदिरांकडे आजही दुर्लक्ष केलं जातं. त्यातल्या कर्मचाऱ्यांचं उत्पन्न तुटपुंजं आहे. त्यामुळे मंदिरांच्या जमिनींना लक्ष्य करण्याऐवजी मंदिरांना भेडसावण्याऱ्या मूलभूत समस्यांचं निराकरण करावं, अशी मागणी या संघटनांनी केली आहे.

**<><><><>**

जळगाव जिल्ह्यात अलिकडेच झालेल्या वादळी पावसानं केळी उत्पादक शेतकऱ्यांचं मोठे आर्थिक नुकसान झालं आहे.

नैसर्गिक आपत्तीमुळे जिल्ह्यात रावेरसह यावल आणि चोपडा तालुक्यातल्या ५१ गावांमधल्या सतराशेहून अधिक शेतकऱ्यांचं नुकसान झाल्याची नोंद कृषी विभागाच्या प्राथमिक अहवालात केली आहे. या पावसाचा सर्वाधिक फटका चोपडा तालुक्याला बसला आहे. या तालुक्यातल्या २४ गावांमधल्या तब्बल ८५० हेक्टरवरच्या केळी बागांचं नुकसान झाल्याची माहिती जिल्हा अधीक्षक कृषी कार्यालयानं दिली.

<><><><><>

नीट पेपरफुटी प्रकरणाचा तपास करणारं सीबीआयचं पथक सलग बाराव्या दिवशीही लातुरात तळ ठोकून असून, या पथकानं आता विद्यार्थी, पालक आणि शिकवणी वर्गांच्या तपासावर लक्ष केंद्रित केलं आहे. त्या व्यतिरिक्त सीबीआयनं आणखी एका डॉक्टरचीही चौकशी केल्याचं सांगितलं जात आहे.

तपासादरम्यान मिळालेल्या माहितीतून सीबीआय पुढचे धागेदोरे जोडण्याचा प्रयत्न करत आहे. विविध कागदपत्रं, पुरावे आणि संबंधितांच्या जबाबांच्या आधारे सीबीआय तपास पुढं नेत आहे.

<><><><><>

छत्रपती संभाजीनगरचे एमआयएम पक्षाचे नगरसेवक मतीन पटेल सह हनिफ खानची नाशिक गुन्हे शाखेत आज पाच तास चौकशी झाली. नाशिकच्या टीसीएस कंपनीत धर्मांतराचा प्रयत्न आणि लैंगिक अत्याचारप्रकरणातली संशयित आरोपी निदा खान हिला आश्रय दिल्याचा आरोप या दोघांवर आहे.

<><><><><>

दिल्ली मधे सीएनजी गॅसच्या दरात प्रति किलो दोन रुपयांनी वाढ झाली आहे, त्यामुळे सीएनजी गॅस आता ८३ रुपये प्रति किलो दराने मिळेल. गेल्या दोन आठवड्यातली ही चौथी दरवाढ आहे.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत गतविजेता रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि गुजरात टायटन्स या संघात आज धर्मशाला इथं पात्रता फेरीतला पहिला सामना होणार आहे. हा सामना  संध्याकाळी साडे सात वाजता सुरू होईल.

या सामन्यातला विजेता संघ आयपीएल २०२६च्या अंतिम फेरीत प्रवेश करेल, तर पराभूत संघाला दुसऱ्या पात्रता सामन्यात आणखी एक संधी मिळेल.

उद्या, संध्याकाळी साडे सात वाजता मोहाली इथं होणाऱ्या सामन्यात सनरायझर्स हैदराबादची लढत राजस्थान रॉयल्सशी होईल. या सामन्यात पराभूत होणारा संघ स्पर्धेतून बाहेर पडेल, तर विजयी संघ दुसऱ्या पात्रता फेरीत प्रवेश करेल.

<><><><><>

नैऋत्य मोसमी पावसाचं आगमन आज केरळमधे होण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. राज्यातल्या १४ पैकी चार जिल्ह्यांमधे जोरदार पाऊस पडेल असा अंदाज असून याठिकाणी यलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. केरळ आणि लक्षद्वीप इथल्या १४ हवामान केंद्रांपैकी ६० टक्के केंद्रांवर, पुढचे दोन दिवस २ पूर्णांक ५ दशांश मिलीमीटर पावसाची नोंद झाली तर मान्सूनचं आगमन झालं असं अधिकृतपणे जाहीर केलं जाईल. केरळमधल्या दक्षिणेकडच्या जिल्ह्यांमधे आज सकाळी सात वाजेपर्यंत ५ मिलीमीटर पावसाची नोंद झाल्याचं हवामान विभागानं कळवलं आहे.

//<><><><><>//